# प्रेसनोट दिनांक १२/४/२०१९

## ➢ अल्पवयीन मुलीचे अपहरण करणारे चौघे नराधम सामाजिक सुरक्षा विभाग गुन्हे शाखेच्या जाळयात.

औंध येथील शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेणारी एक अल्पवयीन विदयार्थीनी हिस दिनांक १९/३/२०१९ रोजी अज्ञात व्यक्तीने पळवुन नेले होते. म्हणुन चतुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्ती विरुध्द विद्यार्थीनीचे पालकांनी दिलेल्या तक्रारी वरुन अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा, या विभागामार्फत नमुद दाखल गुन्हयाचा समांतर तपास करीत होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सौ. मनिषा झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी किरण अब्दागिरे यांनी अत्यंत कमी दुव्यावरुन तांत्रिक विश्लेशन केले असता अपह्रत करण्यात आलेली मुलगी ही नांदेड फाटा, सिहगड रोड येथे असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले. अपह्रत करण्यात आलेल्या मुलीचा माग काढुन तिस व तिचे अपहरण करणारे चार आरोपी नामे १. आसीफ अन्सार मुल्ला वय २९ वर्षे रा. चोवीसावाडी, च-होली बु// ता हेवली जि पुणे, २. सुदर्शन ऊर्फ चिम्या जाधव वय २४ वर्षे रा. केळगाव ता खेड जि पुणे, ३. विशाल अशोक सोनवणे वय २३ रा. सहयोग नगर, वारजेमाळवाडी पुणे, ४. अनिल भारत साळुंखे वय २७ वर्षे रा. दळवीवाडा, खंडोबा मंदिरा शेजारी, नांदेड फाटा, सिंहगड रोड पुणे यांना ताब्यात घेवुन पुढील तपासकामी चतुश्रृंगी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री भानुप्रताप बर्गे, सहा पोलीस आयुक्त गुन्हे -२ यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ मनिषा झेंडे, पोलीस उप निरीक्षक योगिता कुदळे, व कर्मचारी किरण अब्दागिरे, राजेंद्र कचरे, अनुराधा धुमाळ, रमेश लोहकरे, नितीन तरटे, नितीन तेलंगे यांनी केली आहे.